www.rajdand.com
सातारा सोमवार
१५.१.२०२४
पृष्ठ ४ ! मूल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासाहतेची

# लोकसभा निवडणुकीची घोषणा कधी ?

**मुंबई :** आगामी लोकसभा निवडणुकीची घोषणा कधी होणार याचीच देशात आता उत्सुकता आहे. पुढील सोमवारी होणारा राममंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा आणि १ तारखेला लेखानुदान सादर झाल्यावर कधीही लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाण्याचा अंदाज दिल्लीच्या राजकीय वर्तुळात व्यक्त केला जात आहे.

विद्यमान लोकसभेची मुदत १६ जून रोजी संपुष्टात येत आहे. २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीची घोषणा १० मार्चला झाली होती. तसेच ११ एप्रिल ते १९ मे या काळात सात टप्प्यांमध्ये लोकसभेसाठी मतदान झाले होते. यामुळे नियोजित वेळेनुसार निवडणुकीची घोषणा मार्चच्या पहिल्या आठवड्यात होऊ शकते. पण यंदा लोकसभा निवडणूक मार्च - एप्रिलमध्येच घेतल्या जातील, अशी चिन्हे आहेत.

पुढील सोमवारी अयोध्येत राममंदिराची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. त्यानिमित्त देशभर वातावरणनिर्मिती करण्यात येत आहे. भाजपने राम मंदिराच्या मुद्दयावर जनतेची मने आणि मते जिंकण्यावर भर दिला आहे. राम मंदिराचा राजकीय लाभ उठविण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. राम मंदिरावर वातावरणनिर्मिती झाली असतानाच लोकसभेची निवडणूक झाल्यास त्याचा भाजपला मतांमध्ये फायदा होऊ शकतो. यातूनच अयोध्येतील राममंदिर जनतेसाठी



खुले झाल्यावर लगेचच निवडणुकीची घोषणा होऊ शकते, असे सांगण्यात येते.

राममंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडल्यावर लगेचच १ फेब्रुवारीला लोकसभेत लेखानुदान सादर केले जाईल. आगामी निवडणुकीत मतपेरणीसाठी याचा फायदा घेतला जाईल. शेतकरी व विविध घटकांना खुश करण्याचा यातून प्रयत्न केला जाणार आहे. चार महिन्यांच्या खर्चाचे लेखानुदान फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात मंजूर झाल्यावर लोकसभा निवडणुकीची कधीही घोषणा होऊ शकते, असे सांगण्यात येत आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची मणिपूर ते मुंबई दुसऱ्या टप्प्यातील यात्रा सुरू होत आहे. या यात्रेला कितपत प्रतिसाद मिळतो याकडे भाजपचे बारीक लक्ष असेल. यात्रेला सुरुवातीपासूनच अनपेक्षित प्रतिसाद मिळू लागल्यास भाजपसाठी तो धोक्याचा इशारा असेल. लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यास राहुल गांधी यांच्या यात्रेच्या कार्यक्रमावर बंधने येऊ शकतात हे भाजपचे गणित आहे.

इंडिया आघाडीत अद्यापही जागावाटपावर एकमत झालेले नाही. इंडिया आघाडीतील घटक पक्षांमध्ये समन्वय साधला जाऊ नये, असाच भाजपचा प्रयत्न असेल. कारण एकाक एक लढत झाल्यास काही राज्यांमध्ये भाजपसमोर आव्हान उभे राहू शकते. यातूनच इंडिया आघाडी अधिक भक्कम होण्यापूर्वीच निवडणूक घोषित झाल्यास घाईघाईत जागावाटपावर सहमती घडून येणे शक्य होणार नाही.

राम मंदिराचा निर्माण होणारा ज्वर लक्षात घेता लोकसभा निवडणूक लवकर जाहीर व्हावी, असाच भाजपचा प्रयत्न असेल. यामुळे फेब्रुवारीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जाते.



## छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा यंदा शेतकऱ्यांच्या हस्ते होणार

**मुंबई :** छत्रपती शंभूराजांचा ३४३ वा राज्याभिषेक सोहळा येत्या मंगळवारी १६ जानेवारीला राजधानी किल्ले रायगड होणार असून तो शेतकऱ्यांच्या हस्ते पार पडणार आहे. या सोहळ्याला तमाम शिवशंभू भक्तांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री शंभूछत्रपती राज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

गेली नऊ वर्षे शंभूछत्रपती राज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने रायगडावर विविध संकल्पनांच्या माध्यमातून शिवशंभू राजांचा राज्याभिषेक सोहळा साजरा केला जात आहे. यंदा पोशिंदा राजा या संकल्पनेवर सोहळ्याचं आयोजन केलं असून कृषी क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांच्या हस्ते राज्याभिषेक संपन्न होणार आहे, अशी माहिती समोर आली आहे.

जगाचा पोशिंदा शेतकरी राजा सुखी व्हावा म्हणून राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांनी शेतीविषयी धोरण अवलंबून दुष्काळी परिस्थितीत रयतेला आधार दिला. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही धक्का लागता कामा नये, मुलुखगीरी करत असता आपणास जो जिन्नस लागेल तो त्याचा योग्य मोबदला देऊनच घ्यावा हाच शिरस्ता छत्रपती संभाजीमहाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई, छत्रपती थोरले शाहू महाराज ते राजर्षी शाहू महाराज यांनी घेतला आणि काळानुसार बदल करत शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी योगदान दिले होते. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना त्याच शेतकऱ्याच्या हस्ते या वर्षीचा राज्याभिषेक सोहळा दिमाखात साजरा केला जाणार असल्याचे सोहळा समितीने सांगितले.



# स्वच्छतेची जीवनशैली




स्वच्छतेसाठी स्पर्धा, प्रलोभन या गोष्टींचा वापर करावा लागणे, हीच गोष्ट मुदलातच खूप बोलकी आहे. परंतु सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत अद्याप आपल्याला एवढी मजल मारायची आहे, की अशा सर्व प्रकारचे प्रयत्न करण्याशिवाय पर्यायही नाही. पण जोपर्यंत 'सार्वजनिक स्वच्छता' प्रत्येकाच्या अंगवळणी पडत नाही, त्याची संस्कृती निर्माण होत नाही तोवर हा प्रश्न भेडसावत राहील, याचे भान विसरता कामा नये.

'स्वच्छ भारत अभियानां'तर्गत कामगिरी बजावलेल्या शहरांच्या आणि राज्यांच्या यादीवर नजर टाकल्यास स्वच्छतेच्या बाबतीत महाराष्ट्रासह काही राज्ये प्रगती करताना दिसताहेत, ही आनंदीचा बाब. अभियानाला सुरवात झाली तेव्हा शंभरच्या आत शहरांचा सहभाग होता. अभियानाच्या विविध गटातील सहभागी शहरांचा आकडा पाच हजारापार गेला, हे उल्लेखनीय.

पश्चिम बंगालमधील शहरे स्वच्छतेत सुमार ठरली असली तरी त्यांचे स्पर्धेत पहिल्यांदाच उतरणे हेही महत्त्वाचे. गेली सलग सात वर्षे देशात स्वच्छतेत अव्वल ठरलेल्या इंदूरने मारलेली बाजी आणि स्वच्छतेचा जीवनशैली म्हणून केलेला अंगीकार अनुकरणीय आहे. तीन दशकांपूर्वी सुरतमध्ये प्लेगचे साथ आली होती. त्या सुरतने इंदूरच्या बरोबरीने स्वच्छतेत घेतलेली आघाडी नागरिक आणि प्रशासनाच्या प्रयत्नांच्या ध्यासाची साक्ष देते.

या यादीत नवी मुंबई, पुणे, सासवड, लोणावळा, कराड, विटा, सिल्लोड, पाचगणी, देवळाली अशा कितीतरी गावांनी बजावलेली कामगिरी महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. महत्त्वाचे म्हणजे, स्वच्छतेत राज्याच्या गटात महाराष्ट्राचे अव्वल ठरणे हुरूप वाढवणारे आहे.

सुमारे आठ वर्षांपूर्वी देशव्यापी स्वच्छता अभियान सुरू करताना सरकारने दूरगामी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवली होती. समाजातील सर्व घटकांत स्वच्छतेबाबत जाणीव जागृती निर्माण करणे आणि त्याला व्यापक चळवळीचे रूप देऊन लोकसहभाग वाढवायचा होता. स्वच्छतेबाबत गावखेड्यापासून ते महानगरांपर्यंतच्या पातळीवर स्पर्धात्मक वातावरण निर्माण करून त्या-त्या भागातील स्वच्छता आणि आरोग्य यांचे संवर्धन करणे हादेखील हेतू होता.

या कामगिरीचे मोजमाप करण्यासाठी थेट त्या भागाची पाहणी आणि जनतेचा त्याबाबतचा अभिप्राय आणि इतर निकषांचा वापर केला. या सगळ्यांमुळे स्वच्छता ही जीवनशैली बनली, ही जमेची बाजू म्हणावी लागेल. सुरतमधील प्लेगच्या साथीनंतर स्वच्छतेवर अधिक भर देऊन दारोदारी कचरा संकलक घंटागाड्या पाठवणे आणि त्यानंतर संकलित कचऱ्यावर प्रक्रिया यासाठी स्थानिक प्रशासनांनी आतापर्यंत अनेक प्रयोग केले.

सरलेल्या वर्षात 'कचऱ्यातून संपत्तीनिर्मिती' हे अभियानाचे ध्येय होते. त्यात बऱ्यापैकी यश आले आहे. देशात अव्वल ठरलेल्या महाराष्ट्रापुरते बोलायचे तर ८९टक्के घरांतून कचरासंकलन, त्याचे उगमापाशीच ६७ टक्के वर्गीकरण होत असल्याचे आढळले. राज्यात चांगली कामगिरी करणारी शहरे त्यामुळेच स्वच्छतेत आघाडी घेऊ शकली आहेत.

शहरे स्वच्छ झाली तरी त्यातून निर्माण होणाऱ्यावर कचऱ्यावर प्रक्रिया हे मोठे आव्हान असते. ज्या भागात तो टाकला जातो आणि जिथे त्यावर प्रक्रिया होते, त्या भागातून होणारा विरोध पुणे, औरंगाबाद, नाशिकसह अनेक शहरांनी अनुभवला आहे. त्यातून प्रदूषणासह आरोग्यावर विपरित परिणामांपर्यंत नवनवे प्रश्नही जन्माला आले आहेत.

तथापि, २०१४मध्ये १५-१६टक्के कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया व्हायची. हे प्रमाण आता ७६ टक्क्यांवर पोचले आहे. आगामी काळात सगळ्याच कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रियेचे उद्दिष्ट असल्याचे नागरविकास मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी सांगितले. ही या अभियानाची यशस्वीता म्हटली पाहिजे. चालू वर्षासाठी 'रिड्युस, रियुज आणि रिसायकल' म्हणजे कचऱ्याची कमीतकमी निर्मिती करणे, कचऱ्यातील वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि कचऱ्यातून टिकाऊ वस्तूंची निर्मिती हे अभियानाचे ध्येय असेल. साऱ्या जगभरच या सूत्राचा अधिकाधिक अंगीकार होतो आहे. वस्तूनिर्मिती कंपन्याही आपल्या उत्पादनातूनही हे काही प्रमाणात राबवत आहेत.

कोरोनाच्या महासाथीमध्ये स्वच्छतेचे महत्त्व आणि जीवनशैली म्हणून त्याचा स्वीकार किती महत्त्वाचा आहे, हे अधोरेखित झाले आहे. त्यामुळेच स्वच्छता अभियान सरकारी मोहीम आहे आणि त्याचे दायित्व स्थानिक स्वराज्य संस्थांचेच आहे, या मानसिकतेतून नागरिकांनी बाहेर पडल्याशिवाय त्याचे जीवनशैलीत रूपांतर होणार नाही.

भूमिगत गटारे साफ करणाऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधून त्या कामाच्या यांत्रिकीकरणाची सूचना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नुकतीच केली.

या बाबतीत तातडीने कार्यवाही व्हावी, हे सर्वच अर्थांनी आवश्यक आहे;विशेषतः मानवतेच्या. आजही सन्मानास पात्र शहरांना कचऱ्याचे ढीग, रस्त्यांवर उडणारा कचरा, श्वानांच्या विष्ठांसह रंगलेल्या भिंती, दुर्गंधीने नाक मुठीत धरून जावी लागणारी स्वच्छतागृहे आहेत, हे नग्न वास्तवही नाकारता येत नाही. त्यामुळेच पुरस्काराने कौतुकाची झूल अंगावर चढली असली तरी सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत अद्यापही जाणवणारा दिव्याखालचा अंधार दूर केला पाहिजे.



# पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांची कॉ. आडम मास्तर यांच्या निवास्थानी सदिच्छा भेट

## विविध कामगारांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारले

**सोलापूर :** सोलापूरातील हातमाग कामगारांना संक्रांतीला १५ हजार रुपये उत्सव भत्ता देण्यासंबंधी शासन निर्णय झाला होता. परंतु सदर शासन निर्णयात सोलापूर विभागासाठी घोंगडी वर्गात समावेश केल्याने उत्सव भत्त्यापासून वंचित राहिले. याकरिता शासन निर्णयात दुरुस्तीसह शासन निर्णय जाहीर करण्याचे आश्वासन दिले. तसेच सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन बाबतच्या मागणी विषयी मा. पालकमंत्री यांच्या उपस्थित बैठक घेऊन प्रश्न निकाली लावण्याची मागणी केली. स्व.करण म्हेत्रे यांच्या अंतयात्रेत सहभाग झालेल्या मोची समाजातील २५० जणांवर ३५३ कलमान्वये गुन्हे दाखल केले. सदर गुन्हे मागे घेण्यासंबंधी वेळोवेळी आडम मास्तर यांनी पोलीस प्रशासन व महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे. याबाबत तातडीने निर्णय घेण्याची विनंती मा. पालकमंत्री यांच्याकडे केली. यावेळी मा. पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी वरील सर्व मागण्यांच्या निवेदनावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

१९ जानेवारी २०२४ रोजी होणाऱ्या सोलापूरातील ३० हजार असंघटीत कामगारांच्या गृहनिर्माण प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरांचा नियोजित हस्तांतरण सोहळा संपन्न होणार असून त्या अनुषंगाने आज सकाळी ८.३० वाजता सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. चंद्रकांत दादा पाटील यांनी ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांच्या निवास्थानी सदिच्छा भेट दिले.

यावेळी कामगारांनी मा.चंद्रकांतदादा पाटील औक्षण केले व जोरदार स्वागत केले. आडम मास्तर यांच्या परिवाराकडून जय्यत स्वागत व सत्कार करण्यात आला.

यावेळी आडम यांच्या कुटुंबीयांसोबत मनमुराद गप्पागोष्टी व आदरातिथ्य पार पडला.

यावेळी कामिनीताई आडम, डॉ. किरण आडम, कॉ. नलिनीताई कलबुर्गी, युसुफ शेख (मेजर), नसीमा शेख, शेवंताताई देशमुख, सुनंदा बल्ला, कुर्मय्या म्हेत्रे, व्यंकटेश कोंगारी, मुरलीधर सुंचू, अब्राहम कुमार, तौफिक शेख, व्यंकटेश मादगुंडी, राजू काकी, वीरेंद्र पद्मा, श्रीनिवास म्हेत्रे, ड.अनिल वासम, दाउद शेख, नरेश दुगाणे, गजेंद्र दंडी, विल्यम ससाणे, बापू साबळे, मोहन कोक्कुल, विक्रम कलबुर्गी, पांडुरंग म्हेत्रे, नरसिंग म्हेत्रे, हसन शेख, अप्पाशा चांगले, रफिक काझी,अकील शेख ,आसिफ पठाण, इलियास सिद्दीकी, वसीम देशमुख ,शाम आडम, सुरेश बागलकोटे, लक्ष्मीनारायण जोरिगल आदींची उपस्थिती होती.

# पत्रकारांचे प्रश्न न सोडवणाऱ्या सरकारच्या विरोधात आमचा लढा सुरूच राहील : एस.एम. देशमुख

## माहूर येथे राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा व पत्रकारांचा मेळावा उत्साहात

**माहूर :** 'मराठी पत्रकार परिषदेची कोणतीही राजकीय भूमिका नाही. जे सरकार पत्रकारांचे प्रश्न सोडवतील, आह्मी त्या सरकारच्या सोबत आहे. पण जे सरकार पत्रकारांचे प्रश्न सोडवणार नाही, आम्ही त्यांच्या विरोधात लढत राहू. मग ते सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी आह्मी लढा सुरूच ठेवू,' असे प्रतिपादन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केले.

मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारा वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ आणि रंगा अण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व पत्रकार मेळावा शनिवारी, (१३ जानेवारी २०२४) नांदेड जिल्ह्यातील श्री क्षेत्र माहूरगड येथे उत्साहात पार पडला.

यावेळी देशमुख बोलत होते. याप्रसंगी आमदार भीमराव केराम, स्वागताध्यक्ष रामदास सुमठाणकर, माहूर नगर पंचायत नगराध्यक्ष फिरोज दोसानी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम.देशमुख, नांदेड भाजप जिल्हाध्यक्ष सुधाकर भोयर, जिल्हा परिषद नांदेड माजी उपाध्यक्ष समाधान जाधव, शिवसेना विधानसभा क्षेत्रप्रमुख ज्योतिबा खराटे, माहूर नगर परिषद माजी नगराध्यक्ष समरजी त्रिपाठी, मराठी पत्रकार परिषद विश्वस्त किरण नाईक, परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे, कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस मन्सूरभाई शेख, कोषाध्यक्ष विजय जोशी, टीव्ही असोसिएशनचे अध्यक्ष विनोद जगदाळे, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, मराठी पत्रकार परिषद राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी, डिझिटल मीडिया राज्याध्यक्ष अनिल वाघमारे,



लातूर विभाग विभागीय संघटक प्रकाश कांबळे, नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघ गोवर्धन बियाणी, जिल्हा कार्याध्यक्ष संतोष पांडागळे, माहूर तालुका मराठी पत्रकार संघ तालुकाध्यक्ष सरफराज दोसानी यांच्यासह राज्यभरातून आलेले पदाधिकारी, पत्रकार, मराठी पत्रकार परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

# वावरहिरेत भरला बालचमुंचा बाजार

**वावरहिरे :** येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी व्यवहार ज्ञान यावे यासाठी बाल बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. या बाजारामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी भाजीपाला, शालेय वस्तू, जीवनावश्यक वस्तू, खाऊच्या वस्तू अशा विविध वस्तूंची दुकाने थाटली होती. या दुकानांना गावातील ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याने



विद्यार्थ्यांची खरेदी विक्री चांगली झाली.

या बाजाराचे उद्घाटन माण तालुका खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन विष्णू चव्हाण यांच्या हस्ते झाले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष पल्लवी जाधव ग्रामपंचायत सदस्य पुनम खुस्पे , नीलम भोसले, गौरी कचरे, पौर्णिमा कठाणे, निकिता गुळिक व शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य ग्रामस्थ पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राम मंदिराचे उद्घाटन

**पुणे :** राम मंदिराच्या उद्घाटनावरुन काँग्रेसवर टीका केली जाते. परंतु, राम मंदिराच्या उद्घाटनाला कुणाचाही विरोध नाही, फक्त लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून त्याचं उद्घाटन केलं जात आहे. मंदिराचे बांधकाम अर्धवट आहे. तरीही उद्घाटन केलं जात आहे, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी पुण्यात दिली.

इंडिया आघाडीची जमेची बाजू : पुण्यातील जुन्नर येथे भव्य शेतकरी मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. तेथे शरद पवार यांनी पत्रकार परिषदेमध्ये विविध प्रश्नांची उत्तरे दिली. दिल्लीतील 'इंडिया' आघाडी बैठकीबाबत बोलताना शरद पवार म्हणाले, 'अनेक राज्याचे मुख्यमंत्री, महत्त्वाचे नेते बैठकीत सहभागी झाले. एकविचाराने निवडणुकीला सामोरे जाण्याचा



विचार झालाय. जागा वाटपाचा निर्णय घेऊन काही वाद आहे, ते मिटवले जावे. याबाबत चर्चा झाली असून 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व खरगेंनी घ्यावं, अशी सूचना काही सहकाऱ्यांनी केली आहे आणि अनेकांचा त्यांना पाठिंबा आहे.' पवार पुढे म्हणतात की, 'एक कमिटी नेमली जावी असं मत होतं. एकत्रित सभा घेण्यासाठी एक कमिटी व्हावी अशा अनेक सूचना मांडण्यात आल्या आहेत. आज देशाला पर्याय देण्यासाठी विविध राजकीय पक्ष सत्ताधाऱ्यांच्या विरोधात एकत्र येत आहेत. हीच इंडिया आघाडीची जमेची बाजू आहे.'

# ओबीसी आरक्षणाला कुठेच धक्का लागता कामा नये

## बीडमधील महाएल्गार मेळाव्यात भुजबळांचा इशारा

**बीड :** कोड नंबर देऊन बीडमध्ये जाळपोळ करण्यात आलीये. बीडमध्ये विचारपूर्वक प्लॅनिंग करुन जाळपोळ झालीये, असा आरोप मंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसी महाएल्गार मेळाव्यात केला. बीडमध्ये जाळपोळ झाली तेव्हा काही मुस्लिम बांधवांनी लोकांना वाचवलं असल्याचं भुजबळांनी म्हटलं. त्यातील काही लोकांचा सत्कार देखील भुजबळांनी यावेळी व्यासपीठावर केला. यावेळी बोलताना छगन भुजबळ यांनी मनोज जरांगेंवर हल्लाबोल केलाय.

नाथ मुंडे असते तर ओबीसी आरक्षणाचा प्रश्नच निर्माण झाला नसता, असं ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसी महाएल्गार मेळाव्यात म्हटलं. बीडमध्ये शनिवार १३ जानेवारी रोजी ओबीसी महाएल्गार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी



छगन भुजबळ यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन हल्लाबोल केला.

जरांगेंवर हल्लाबोल

तीन कोटी मराठा समाजाला मुंबईत घेऊन जाणार, असं उपोषणकर्ते सांगतायत. तुम्ही फिर फिरणार आणि हॉस्पिटल मध्ये झोपणार. दोन, चार मिटींगा घेणार. अजित पवार इतकचं म्हणाले की, तुम्ही कायदा पाळा. त्यांच्यावर कीती घाणरेड्या शब्दांत त्यांच्यावर टीका करण्यात आली. एवढी मस्ती कुठून आली तुला, असं म्हणत छगन भुजबळांनी जरांगेंवर हल्लाबोल केला.

**रोहित पवार दुसऱ्या दिवशी जरांगेला बघायला गेले - भुजबळ**

संदीप क्षीरसागर, रोहित पवार हे दुसऱ्या दिवशी जरांगेला भेटायला हॉस्पिटलला गेले,ते कशाला गेले असा सवाल देखील भुजबळांनी यानिमित्ताने उपस्थित केलाय. पुढे त्यांनी म्हटलं की, शाब्बास की देतो, सुभाष राऊत दुसऱ्या दिवशी ओबीसीच्य कामासाठी बाहेर पडले, असं भुजबळांनी म्हटलं.

इतिहासात कुठेही नमूद नाही, छत्रपतींचे मराठ्यांना घेऊन लढले - भुजबळ

इतिहासात कुठेही म्हटलं नाही, की शिवाजी महाराज म राठ्यांना घेऊन लढले. इतिहासात शिवाजी महाराज मावळे घेऊन लढले,असंच म्हटलंय. आता हेच त्याच छत्रपतींचे नाव घेऊन आम्हाला शिवीगाळ करतायत, आमची लायकी काढतायत, असे म्हणत भुजबळांनी हल्लाबोल केला. अनेक संत या ओबीसी समाजाने महाराष्ट्राला दिले, असे भुजबळांनी म्हटले.

ओबीसीतून मराठा आरक्षण घेऊ देणार नाही - छगन भुजबळ

या सगळ्यांना जाळपोळ करायला कोणी भर घताली, याचा अर्थ हे सगळे तुमचेच गुंड होते, असा आरोप भुजबळांनी त्यांच्या भाषणातून केलाय. जालन्यात ५ हजार रुपयाचा पिस्तूल येत आहेत. हे कशासाठी याचा शोध घ्या, कोण आणतंय, कशासाठी आणतंय, याचा छडा लागला पाहिजे. आमच्या पाठिशी उभं राहायला सांगतायत, मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्या, मी तुमच्या पाठिशी आहे. पण आता हे लोक बोलतायत ओबीसीतूनच मराठा आरक्षण हवं, पण मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण घेऊ देणार नाही. सर्वोच्च न्यायालयानं त्यांचं आरक्षण फेटाळलं. आता मला आश्चर्य वाटतंय,वेगवेगळे आयोग उभे राहिलेत. त्यांचं काम एकच, मराठा समाजाला आरक्षण द्यायचं आहे.

**संविधानाने दिलेला अधिकार सोडणार नाही**

मी सरकारला सांगतो की, कुठेही ओबीसी आरक्षणाला धक्का लागता कामा नये, ही जबाबदारी सरकारचीच असल्याचं म्हणत भुजबळांनी सरकारला इशारा दिला. त्यांच्यासाठी सगळं करता, आमची केस सुरु आहे. त्यामुळे ओबीसींना धक्का लागता कामा नये. आम्ही कायदा हातात घेणार नाही, पण संविधानाने जो अधिकार दिलाय, तो घेतल्याशिवाय आम्ही राहणार नाही.




मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# सामाजीक संस्थाप्रमाणे तळागाळापर्यन्त पोहचुन कार्य करण्याची गरज

## कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री : मंगल लोढा



सामाजीक संस्थाप्रमाणे तळागाळापर्यन्त पोहाचुन कार्य करण्याची गरज शासकीय व गैरशासकीय संस्थान असल्याचे प्रतिपादन कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगल लोढा यांनी केले.

सेंटर फॉर यूथ डेवलपमेंट अँड ॲक्टिव्हिटी (सी.वाय. डी.ए) संस्थेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजीत चार दिवसीय महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात आभासी मार्गदर्शन ते बोलत होते.

यावेळी मंचावर कोफॉरजचे राजेश शेट्टी आणि त्रिणा बालकृष्णन, कॉर्पोरेट गव्हरनेंसचे डॉ. नितीन मेटकर, यूपीएस एक्सप्रेस प्रा.लि.चे शहाजी चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, सध्या स्टार्ट-अप साठीचे चांगले वातावरण निर्माण झाल्याने अनेक संधी उपलब्ध होत आहे, युवकांना तसेच महिलाना त्यासाठी मार्गदर्शन व मदत सीवायडीने दिल्याने अनेकांचे आयुष्य बदलले असल्याचे वक्तव्य त्यांनी केले. यावेळी नवव्यवसायकाना बीजभांडवल देण्यात आले. एका स्पर्धात्मक सादरीकरणातून ही निवड करण्यात आली.

समारोप कार्यक्रमाचे संचलन हे संस्थापक म्याथू मट्टम यांनी, तर प्रास्ताविक यूथएड फाऊंडेशनचे कार्यकरणी सदस्य उज्ज्वल अनू चौधरी, तसेच ज्योत्स्ना बहिरट यांनी आभार प्रदर्शन केले.

रौप्यमहोत्सवाच्या दरम्यान पाणी-आरोग्य आणि स्वच्छता, युवा व शिक्षण तसेच येस समीट अर्थात तरुण उद्योजक शिखर परिषद घेण्यात आली.

*तरुण उद्योजक शिखर परिषद*

आत्मनिर्भरतेसाठी उदयोजक मानसिकता खूप महत्वाची भूमिका बजावित असते आणि उद्योगासाठी आवश्यक अशा संधी उपलब्ध करून देऊन त्यांना पाठबळ दिल्याने नवउद्योजक घडू शकतात, असा विश्वास शिक्षणतज्ञ उज्ज्वल अनु चौधरी, यांनी केले. ते सेंटर फॉर यूथ डेवलपमेंट अँड ॲक्टिव्हिटी (सीवायडीए) संस्थेच्या २५ व्या रौप्य महोत्सव वर्धापननिमित्त आयोजीत येस समीट -तरुण उद्योजक शिखर परिषद कार्यक्रमात बोलत होते. प्रतिभावंत आणि महत्वाकांक्षी उद्योजकांसाठी त्यांच्या नाविन्यपूर्ण व्यवसाय योजना प्रत्यक्षात चालू करण्यासाठी एक आदर्श व्यासपीठ उपलब्ध करणे, हा मुख्य हेतू दि. १३ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या तरुण उद्योजक शिखर परिषदेचा होता. या परिषदेत शिक्षणतज्ञ उज्ज्वल अनु चौधरी, बीएफएम फंडचे हिमालया राव पोटाळपल्ली आणि इंटरनॅशनल अलायन्स मीडिया अँड एंटरटेनमेंटच्या रोशनी सेहगल यांची उपस्थिती लाभली होती.

शिखर परिषदेच्या विविध सत्रांमध्ये उद्योजकांचे अनुभव सामायिकरण आणि उद्योजकांच्या अडचणी आणि संधी या विषयांवरती विशेतज्ञ चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. सत्राच्या अध्यक्षपदी अँडमास विद्यापीठाचे डॉ. सप्तर्षी चॅटर्जी आणि कोंफॉरजच्या दीप्ती कांबळे हे सत्र नियंत्रक म्हणून उपस्थित होते. या चर्चासत्रात पॅनेल सदस्य म्हणून सीआयई इंडियाचे विनायक कडस्कर, वाससेन बाउम इंजीनीरिंग सोल्यूशनचे नितीन लोखंडे, एक्ससी डिझाईनचे क्ष्ऊंन सेन चेंग, बीटीडबलूचे दिप भोंग, शहाजी बनसोडे, उद्योजक राहुल सिंघवी आणि सुनीता राठोड यांनी उद्बोधन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रियंका कोठारी, ज्योत्स्ना बहिरट आणि प्रवीण जाधव यांनी तसेच संस्थेच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम केले.

हा महोत्सवाच्या निमित्ताने प्रतिभावान तरुणांसाठी एक वैविध्यपूर्ण व्यासपीठ निर्माण करून देण्यात आले होते. नृत्य, संगीत, क्रीडा आणि कला यासह विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी प्रदान करण्यात आली होती. यामुळे तरुणांना विविध भागातील संस्कृती, परंपरा, चालीरीती आणि कलाप्रकारांची माहिती मिळाली, अशाप्रकारे या उपक्रमाची सामुदायिक ऐक्य बळकट होण्यास मदत होणार आहे. शेवटी या कार्यक्रमामार्फत सहभागी स्पर्धकांमधून निवड झालेल्या स्पर्धकांना सी.वाय. डी.ए संस्थेच्या रौप्य महोत्सव वर्धापनदिनाच्या कार्यक्रमांचे उद्घाटन सोहळ्यास कला सादरीकरणाची संधी प्राप्त झाली. युवारंग कार्यक्रम समाप्तीनंतर समुदाय पातळीवर काम करणाऱ्या उदयोजकांच्या विविध वस्तूंच्या प्रदर्शनाचे उदघाटन नाबार्डच्या अनुपमा पवार यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह येथे करण्यात आले. या प्रसंगी ईशान्य फाउंडेशनच्या बिंदु नायर उपस्थित होत्या. हे प्रदर्शन रौप्य महोत्सवात संपूर्ण चार दिवस सर्वांसाठी खुले ठेवण्यात आले होते.

### 'युवारंग'- युवा महोत्सवाचे आणि विविध वस्तूंच्या प्रदर्शनाचे आयोजन

**युवा नेतृत्व, सामाजिक बांधिलकी, कला आणि संस्कृती या विषयांवर विविध समूह नृत्य, समूह गायन आणि संगीत, पथ नाट्य/नाट्यप्रयोग, वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन सेंटर फॉर यूथ डेवलपमेंट अँड ॲक्टिव्हिटी (सीवायडीए) संस्थेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त 'युवारंग' युवा महोत्सवाचे आयोजन १० जानेवारी रोजी करण्यात आला होता. या महोत्सवाला एम. एन. संन्याल, नितेश सिंगरोल, गौरी शास्त्री-देशपांडे आणि सुजाता कोडक अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी सीवायडीएच्या २५ वर्षांच्या कार्याचा गौरव केला. या महोत्सवात विविध क्षेत्रातील प्राविण्य असणारे एकूण तीन राज्यातून दिडशेपेक्षा अधिक युवा कलाकार सहभागी झाले होते.**

### पाणी-आरोग्य आणि स्वच्छता

**पाणी व स्वच्छता या आयामाना समाजाच्या सर्व स्तरात नेण्यासाठी समाजसेवी संस्थानी सरकारला केलेले सहकार्य व पुढाकार कौतुकास्पद असून या सामाजीक सहयोगाने सर्वदूर गोदरीमुक्त व पेयजल व्यवस्था भविष्यातही उत्कृष्टपणे कार्यान्वयीत होईल, असा विश्वास नीती आयोगाचे अतिरिक्त अभियान संचालक आनंद शेखर यांनी केले. दि. ११ जानेवारी २०२४ रोजी सेंटर फॉर यूथ डेवलपमेंट अँड ॲक्टिव्हिटी (सीवायडीए) संस्थेच्या २५ व्या रौप्य महोत्सव वर्धापननिमित्त आयोजीत वॉश समीट उपक्रमाच्या कार्यक्रमात बोलत होते.**

### उद्घाटन समारंभ

**सेंटर फॉर यूथ डेवलपमेंट अँड ॲक्टिव्हिटी (सीवायडीए) संस्था ही युवकांच्या विषयांवरती काम करून राष्ट्र निर्माण कार्यासाठी खूप महत्त्वपूर्ण हातभार लावण्याचे काम करत आहे, असे प्रतिपादन, विकार होली क्रॉस चर्च नदायल चे रेव्ह. फा. गरवासिस मट्टम यांनी केले. ते सेंटर फॉर यूथ डेवलपमेंट अँड ॲक्टिव्हिटी (सीवायडीए) संस्थेच्या २५ व्या रौप्य महोत्सव वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात बोलत होते. गेली २५ वर्षे सीवायडीए संस्था युवक विकास, उपजीविका, कौशल्य विकास, कला आणि संस्कृती, शिक्षण, ग्रामीण विकास, पाणी, आरोग्य, स्वच्छता इत्यादि क्षेत्रात कार्यरत आहे आणि या वर्षी २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विविध समाजपयोगी कार्यक्रमांचे आयोजन दि. १० जानेवारी ते १३ जानेवारी दरम्यान आयोजित केले होते. गेल्या २५ वर्षापासून युवक व त्यांच्या विविध आयामांवर कार्यरत विविध विषयांवरती काम करणाऱ्या सीवायडीए संस्थेच्या रौप्य महोत्सव वर्धापनदिनाच्या कार्यक्रमांचे उद्घाटन दि. १० जानेवारी रोजी अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह, येरवडा पुणे येथे पार पडले. या वर्धापनदिनाच्या निमित्ताने पुढील तीन दिवस दि. ११ जानेवारी २०२४ रोजी पाणी, आरोग्य, स्वच्छता-वॉश शिखर परिषद, दि. १२ जानेवारी युवा शिखर परिषद आणि दि. १३ जानेवारी रोजी तरुण उद्योजक शिखर परिषदेचे आयोजन केले होते.**

यावेळी शिक्षणतज्ञ उज्ज्वल अनु चौधरी, नेपाळचे संतोष शहा, आईडबलूयेचफ संस्थेच्या माजी अध्यक्ष अर्णवाज दमानिया, आणि नगरसेवक अविनाश साळवे हे मान्यवर उपस्थित होते. अविनाश साळवे यांनी सीवायडीएच्या कार्याचे कौतुक करताना संस्थेने आजवर युवा नेतृत्व विकास, सामाजिक बांधिलकी, उद्योजकता, शिक्षण, आरोग्य, कला आणि संस्कृती, पाणी, आरोग्य, आणि स्वच्छता या क्षेत्रात विविध उपक्रम राबवून मोलाचे योगदान दिल्याचे नमूद केले. या कार्यक्रमदरम्यान म्यॅथु मट्टम लिखित ट्रेंड दि रोड लेस ट्रॅव्हल्ड पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

सीवायडीएच्या २५ व्या वर्धापनदिन सोहळ्याचा मुख्य उद्देश हा विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवक यांच्या अमूल्य योगदानाचा सन्मान करणे हा होता. या कार्यक्रमात सीवायडीए संस्थेच्या २५ वर्षांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला आणि युवा वर्गाला संस्थेच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक म्यॅथु मट्टम, तर अतिथीचे स्वागत शांताराम बडगुजर यांनी केले.



## डॉ.दीपक हरके यांचा अभिनेत्री जयाप्रदा यांच्या हस्ते 'इंटरनॅशनल एक्सेलन्स अवॉर्ड' देऊन सन्मान

**पिंपरी :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक आणि १८२ विश्वविक्रम करणारे पहिले भारतीय डॉ. दीपक हरके यांना 'इंटरनॅशनल एक्सेलन्स अवॉर्ड' प्रदान करण्यात आला.

दिल्ली येथील रॅडीसन ब्ल्यू हॉटेल मध्ये आयोजित केलेल्या एज्युकेशन समिट मध्ये सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री जयाप्रदा यांच्या हस्ते डॉ. दीपक हरके यांना मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय माजी उपाध्यक्ष श्याम जाजू, ब्रह्माकुमारी सरोज दीदी आदी उपस्थित होते.

भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी विशेष योगदान दिल्याबद्दल डॉ. हरके यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. हरके यांना मिळालेल्या सन्मानामुळे राजयोग केंद्रांमधील युवा प्रशिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मोरया प्रतिष्ठानच्या पतंग महोत्सवाला वडगाव शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद

**वडगाव मावळ :** मकरसंक्रांतीचे औचित्य साधून मोरया महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अबोली मयूर ढोरे यांच्या संकल्पनेतून वडगाव शहर मर्यादित भव्य पतंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या पतंग महोत्सवात शहरातील लहानांपासून ते जेष्ठांपर्यंत सुमारे १२०० ते १३०० पतंग प्रेमी मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

यावेळी उपस्थित असलेल्या सर्व पतंग प्रेमींना मोरया प्रतिष्ठानच्या वतीने मा नगराध्यक्ष मयूर ढोरे यांच्या वतीने पतंग आणि दोऱ्याचे रीळ विनामूल्य वाटप करण्यात आले. यात लहान मुले-मुली, युवक तसेच पालकांनी मनसोक्त पतंग उडवण्याचा आनंद लुटला.

यावेळी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष बाळासाहेब ढोरे, मंगेश ढोरे, मुख्याधिकारी डॉ प्रविण निकम, मा नगराध्यक्ष मयूर ढोरे, मोरया महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अबोली ढोरे, पोटोबा देवस्थान विश्वस्त सुभाषराव जाधव, मा सरपंच बापूसाहेब वाघवले, अरूण चव्हाण, मा उपसरपंच पंढरीनाथ ढोरे, उपसरपंच तुकाराम ढोरे, सभापती गुलाब म्हाळसकर, श्रीधर ढोरे, बारकूनाना ढोरे, शांताराम कुडे, पत्रकार ज्ञानेश्वर वाघमारे, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष अतुल राऊत, नगरसेवक राहुल ढोरे, किरण म्हाळसकर, प्रविण चव्हाण, पूनम जाधव, माया चव्हाण, पूजा वहिले, शहर राष्ट्रवादी युवक अध्यक्ष अतुल वायकर,उपसरपंच विशाल वहिले, रा काँ अल्पसंख्याक सेलचे शहराध्यक्ष मजहर सय्यद, उद्योजक सचिन कडू, राजेश ढोरे, समीर दौंडे, रविंद्र काकडे, विनायक भेगडे पुणे काईट्स चे प्रमुख रमेश पारते, श्रीकांत चेपे आणि वडगाव शहरातील हजारों पतंगप्रेमी, सर्वपक्षीय पदाधिकारी, मोरया महिला प्रतिष्ठानच्या पदाधिकारी संचालिका, मोरया प्रतिष्ठानचे सर्व सभासद आणि शहरातील लहान मुले-मुली, नागरिक, मित्रपरिवार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मकरसंक्रांत निमित्ताने घेण्यात आलेल्या या पतंग महोत्सवात आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध प्रकारचे पतंग प्रत्यक्षात उडवण्याची तसेच पाहण्याची सुवर्णसंधी या नवीन वर्षाच्या सुरुवातीच लहान मुलांना तसेच पालकांना अनुभवायला मिळाल्याने सर्वांनी आनंद व्यक्त केला. या पतंग महोत्सवातील मोठ्या पतंगावर प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज, माझी वसुंधरा यांच्या प्रतिकृतीचे पतंग आकाशात झेपावल्याने लहानासह नागरिकांनी आनंद व्यक्त केला.

नेहमीप्रमाणे सामाजिक बांधिलकी जपत येत्या कालावधीतही वडगाव शहरातील नागरिकांसाठी अशाच सामाजिक, सांस्कृतिक, कला मनोरंजन आणि अत्यावश्यक अशा समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल अशी माहिती मोरया प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अबोली मयूर ढोरे यांनी दिली.

## पुणे-नाशिक सेमी हायस्पीडने संगमनेरची गती वाढणार

### औद्योगिकीकरणालाही मिळणार चालना

पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेने केवळ दोन महानगरांना नव्हे, तर विकासाच्या वर्तुळाला जोडले जाणार असल्याने नवी ओळख निर्माण होईल.

अमृत उद्योग समूह, मालपाणी उद्योग समूह, श्रमिक उद्योग समूह, एस. आर. थोरात दूध, हायटेक बसस्थानक, प्रशस्त शासकीय कार्यालये, केजी टू पीजीपर्यंत शैक्षणिक संस्था, अत्याधुनिक सुविधांयुक्त दवाखाने, सराफा बाजार, कापड बाजार, सहकारी संस्था अशा अनेक गोष्टींनी समृद्ध असणाऱ्या संगमनेरची ओळख राज्यात झालेली आहे. आता पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेने केवळ दोन महानगरांना नव्हे, तर विकासाच्या वर्तुळाला जोडले जाणार असल्याने नवी ओळख निर्माण होईल.

अत्यंत रहदारी असणाऱ्या पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे नूतनीकरण झाल्यानंतर दळणवळणाला चालना मिळाली. हा जुना महामार्ग शहरातून जात होता. मात्र, शहरातील रहदारी कमी करण्यासाठी हा बाह्यवळण मार्गाने गेला. त्यामुळे मालवाहतूक वाहने शहराबाहेरून जात असल्याने काही अंशी वाहतुकीची समस्या मिटण्यास मदत झाली. परंतु, समृद्ध शहरांसह तालुक्याला अधिक वेगवान होण्यासाठी सेमी हायस्पीड रेल्वेमुळे मदत होणार आहे.

२३२ किलोमीटर हा सेमी हायस्पीड रेल्वेमार्ग असून, महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडच (महारेल) हा प्रकल्प पूर्ण करणार आहे. याबाबत नुकतेच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सुधारित प्रकल्प आराखड्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली असल्याचे जाहीर केले आहे. याशिवाय लवकरच भूसंपादन करणार असल्याचे संकेतही दिले आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे संगमनेरच्या कृषी व औद्योगिकीकरणाला देखील गती मिळणार आहे. पुणे व नाशिक या दोन शहरांसह इतरही शहरांना यामुळे जोडले जाणार आहे. शेतकऱ्यांना आपला शेतीमाल पाठवणे सहज सोपे होईल, तर औद्योगिकीकरणासाठी आवश्यक असणारा माल पुरवठा देखील वेळेत होईल. यामुळे वेळेसह पैशांची देखील बचत होईल. याचबरोबर नाशिक व पुणे येथे नोकरी व व्यवसायासाठी जाणारे चाकरमानी यांची मोठी सोय होईल. त्यामुळे हा प्रकल्प कधी पूर्ण होईल, याकडे संगमनेरवासीयांचे लक्ष लागून आहे.



### प्रकल्पाची वैशिष्ट्ये...

**२३२ किलोमीटर लांबीचा रेल्वेमार्ग**

**पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातून जाणार**

**रेल्वेचा २०० किलोमीटर प्रतितास वेग, पुढे हा वेग २५० किलोमीटरपर्यंत वाढविणार**

**पुणे-नाशिक अंतर अवघ्या पावणेदोन तासांत**

**पुणे-नाशिकदरम्यान २४ स्थानकांची आखणी**

**१८ बोगदे, ४१ उड्डाणपूल, १२८ भुयारी मार्ग प्रस्तावित**

**रेल्वेस्थानकात प्रकल्पबाधितांसह स्थानिकांना व्यवसायासाठी प्राधान्य**

**विद्युतीकरणासह एकाचवेळी दोन्ही रेल्वेलाइनचे बांधकाम**

## लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ४२ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**सांगली :** लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील ४२ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश अधीक्षक डॉ. बसवराज तेली यांनी शुक्रवारी जारी केले. जिल्ह्यात तीन ते चार वर्षे झालेले, सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असणारे आणि मूळ सांगली जिल्ह्यातील असणारे अधिकारी बदली प्रक्रियेत आहेत.



अधिकाऱ्याचे नाव, सध्याचे ठिकाण व बदलीचे ठिकाण असे : निरिक्षक - अभिजित देशमुख, सांगली शहर (पोलिस कल्याण), संतोष डोके, विटा (विशेष शाखा, सांगली), अरुण सुगावकर, गुप्तवार्ता (मिरज शहर). सहायक निरिक्षक - बजरंग झेंडे, तासगाव (वाहतूक शाखा, विटा), मनमीत राऊत ( वाहतूक शाखा, इस्लामपूर), नितीन राऊत, तासगाव (मिरज उपाधीक्षक), अण्णासाहेब बाबर, आष्टा (आर्थिक गुन्हे शाखा), पल्लवी यादव, विश्रामबाग (गुप्तवार्ता), गजानन कांबळे, विशेष शाखा (सांगली ग्रामिण), जयश्री वाघमोडे, वाहतूक शाखा, विटा (विटा), विनोद कांबळे, कवठेमहांकाळ (आटपाडी), समीर ढोरे, सांगली शहर (तासगाव), प्रियांका बाबर, मानवी तस्करी प्रतिबंधक विभाग (सांगली ग्रामिण), दत्तात्रय कोळेकर, आटपाडी (कवठेमहांकाळ), अनिल जाधव, विटा (चिंचणी वांगी), जयदीप कळेकर, वाहतूक शाखा, इस्लामपूर (आष्टा), भालचंद्र देशमुख, मिरज उपाधीक्षक कार्यालय (कासेगाव), जयसिंग पाटील, शिराळा (कुरळप), गणेश वाघमोडे, कुरळप (दहशतवादविरोधी शाखा), प्रफुल्ल कदम, सांगली ग्रामिण (जिल्हा विशेष शाखा), प्रदीप शिंदे, दहशतवादविरोधी शाखा (आष्टा), सागर गोडे, कवठेमहांकाळ (सांगली शहर). उपनिरिक्षक - जगन्नाथ पवार, कवठेमहांकाळ (जत उपाधीक्षक कार्यालय), सुरेखा सूर्यवंशी, कवठेमहांकाळ (स्थानिक गुन्हा अन्वेषण), आप्पासाहेब पडळकर, आटपाडी (सांगली न्यायालय), स्मिता पाटील, सांगली ग्रामिण (मानवी तस्करी प्रतिबंधक विभाग), दिलीप पवार, कडेगाव (नियंत्रण कक्ष), विजय पाटील, कुरळप (नियंत्रण कक्ष), विद्यासागर पाटील, मिरज शहर (नियंत्रण कक्ष), दीपक सदामते, संजयनगर (नियंत्रण कक्ष), राजू अन्नछत्रे, महात्मा गांधी, मिरज (तासगाव), दीपक माने, सांगली शहर (मिरज ग्रामिण), श्रीकांत वासुदेव, मिरज शहर (इस्लामपूर), प्रमोद खाडे, महात्मा गांधी, मिरज (सांगली शहर), संदीप गुरव, तासगाव (महात्मा गांधी, मिरज), सागर गायकवाड, विटा (इस्लामपूर), रुपाली गायकवाड, सांगली शहर (महात्मा गांधी, मिरज), केशव रणदीवे, मिरज ग्रामिण (सांगली शहर), जयश्री कांबळे, इस्लामपूर (विटा), अफरोज पठाण, विश्रामबाग (जिल्हा विशेष शाखा), मनीषा नारायणकर, जत (आर्थिक गुन्हे शाखा). कासेगावचे सहायक निरिक्षक दीपक जाधव आणि चिंचणी वांगीचे सहायक निरिक्षक संदीप साळुंखे यांनाही नियंत्रण कक्षाकडे नियुक्त केले आहे.

# जिल्हाधिकारी यांच्याकडून रे नगर येथील कार्यक्रम स्थळाची पाहणी



**सोलापूर :** पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत रे नगर येथील पहिल्या टप्प्यातील पंधरा हजार घरकुलांचे वितरण पंतप्रधान महोदय यांच्या हस्ते दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी नियोजित आहे. त्या अनुषंगाने रे नगर येथील कार्यक्रम स्थळाची पाहणी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज केली.

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, रेनगर गृह प्रकल्पाचे प्रवर्तक माजी आमदार नरसय्या आडम, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर, प्रांताधिकारी विठ्ठल उदमले, तहसीलदार किरण जमदाडे, रे नगर फेडरेशन चेअरमन नलिनी कलबुर्गी, सचिव युसुफ शेख, ठेकेदार अंकुर पंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे, जिल्हा राष्ट्रीय सूचना व विज्ञान अधिकारी उत्कर्ष होलकांसे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी घरकुल वितरण कार्यक्रम होत असलेल्या जागेची पाहणी केली. या ठिकाणी व्यासपीठ व व्यासपीठाच्या पाठीमागे आवश्यक कॅम्प ऑफिस, ग्रीन रूम ची माहिती घेतली. तसेच कार्यक्रमासाठी येणाऱ्या लाभार्थी साठी एन्ट्री पॉईंट व एक्झिट पॉईंट ची माहिती तसेच येथे लाभार्थी आल्यानंतर त्यांच्यासाठी शौचालये, पिण्याच्या पाण्याची सुविधा आदी बाबत माहिती जाणून घेतली. माननीय पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासाठी सभास्थळी उपस्थित राहण्यासाठी करण्यात येत असलेल्या हेलिपॅडच्या कामाची पाहणी तसेच सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हेलिपॅड ची जागा योग्य आहे का याचीही त्यांनी माहिती घेतली.

रेनगर फेडरेशनच्या वतीने कार्यक्रमाच्या ठिकाणी किमान एक लाख नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता कळवली असल्याने त्या दृष्टीने सभा ठिकाणच्या परिसरात पंढरपूर येथून ४०० शौचालये आणून ठेवली जाणार आहेत.

तसेच कार्यक्रमाच्या वेळी व कार्यक्रम संपल्यानंतरही या परिसरात स्वच्छतेला अधिक प्राधान्य देऊन जिल्ह्यातील सर्व नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे येथील स्वच्छतेबाबत नियंत्रण अधिकारी म्हणून कामकाज पाहतील तर त्यांच्या अधिनस्त सफाई कर्मचारी ही येथे नियुक्त करण्यात येतील असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी पोलीस अधीक्षक श्री. सरदेशपांडे यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून येथील सभा स्थळाची पाहणी तसेच नागरिक येण्या जाण्याचे मार्ग, पार्किंग व्यवस्थाबाबत माहिती घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.



# शाळकरी मुलांना बॅग व खाऊवाटप करून जपली सामाजिक बांधिलकी

**राजगुरूनगर :** निमगाव खंडोबा (ता. खेड) येथील ग्रामस्थांनी गावचे सुपुत्र ख-ड संकेत भोंडवे यांचा वाढदिवस सामाजिक भान जपत वृक्षारोपण आणि शाळकरी मुलांना स्कुलबॅग वाटप करून साजरा केला. दरवर्षी भोंडवे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला जातो.

सध्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयात संयुक्त सचिवपदी कार्यरत असणाऱ्या भोंडवे साहेबांची संपूर्ण कारकीर्द आदर्शवत आहे. त्यामुळे त्यांचा वाढदिवस दरवर्षी ग्रामस्थ आणि भोंडवे कुटुंबीयांतर्फे असाच आदर्श जपत सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा केला जातो असे गावचे माजी सरपंच अमर शिंदे यांनी सांगितले.

वाढदिवसानिमित्त ११ जानेवारी रोजी सकाळी गावातील खंडोबा मंदिर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आला. यावेळी वड, पिंपळ, गुलमोहोर इत्यादी वृक्षांचे रोपण करण्यात आले. त्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निमगाव खंडोबा येथील गरजू विद्यार्थ्यांना बॅग आणि खाऊवाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, विद्यमान सरपंच बबडाबाई भालेराव, माजी सरपंच अमर शिंदे, संतोष शिंदे, गावातील सामाजिक मंडळाचे अध्यक्ष बबनराव शिंदे, मा सरपंच बी टी शिंदे, बबन नामदेव शिंदे, माजी चेअरमन भाऊसाहेब तांबे, सखाराम मावळे, माजी सरपंच सुनंदा भोंडवे, शुभांगी भालेकर, युवराज शिंदे, सोपान शिंदे, महेश शिंदे, दिनकर भगत, हनुमंत येळवंडे, विठ्ठल शिंदे, भाऊसाहेब खैरे, विक्रम काळे, निलेश राऊत इत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पिंपरी चिंचवड येथील नागरिकांचा देखील उस्फुर्त सहभाग :**

निमगाव येथे झालेल्या या कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड येथील भोंडवे यांच्या मित्रपरिवार आणि स्नेहींनी देखील सक्रिय सहभाग नोंदवला. महेश खेडेकर, राघवेंद्र खेडेकर, दीपक डेरे, अभय लुंकड, अविनाश खरे, महेश भोंडवे, अमोल वाकडकर, संजय येवले, सुरेश ढोरे, भाऊसाहेब लांडगे, राजू दाभाडे, नितीन गवळी, प्रदीप घाटगे, अजय लोहार, अतुल भोंडवे, अभिजित भोंडवे, अमोल भोंडवे, संजय भोंडवे, विलास भोंडवे, विश्वास भोंडवे, आनंद भोंडवे, सागर भोंडवे, साजिद मुलाणी हे उपस्थित होते.

२००७ च्या बॅच चे ख-ड असणाऱ्या संकेत भोंडवे यांनी १५ वर्षांच्या कारकिर्दीत मंत्री नितीन गडकरी यांच्या स्वीय सचिवपदासह अनेक महत्त्वाच्या पदांवर असताना उल्लेखनीय कामे केली आहेत. नवनवीन संकल्पना मांडणे आणि त्या प्रभावीपणे राबवणे यासाठी भोंडवे यांचा लौकिक आहे.

# भाटघर व निरा देवघर धरणाच्या पाण्याचा मुदतपूर्व विसर्ग बंद करा

## अन्यथा वेळ पडल्यास आंदोलनाचा इशारा : आ.संग्राम थोपटे

**भोर :** भोर तालुक्यातील भाटघर व नीरादेवघर धरणातून सध्या मुदतपूर्व विसर्ग पुर्व भागात सुरू आहे.सध्याच्या आवर्तनामुळे गतवर्षीपेक्षा या वर्षी दोन्ही धरणाचा पाणीसाठा खुप कमी झाला आहे. विसर्ग तातडीने थांबवावा अन्यथा जलसंपदा कार्यालय पुणे येथे नागरिकांसह आंदोलन करणार असल्याचे आमदार संग्राम थोपटे यांनी सांगितले.भोर येथे रायरेश्वर डोंगरी विकास परिषद कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत आमदार संग्राम थोपटे यांनी माहिती दिली.

भोर विधानसभा मतदार संघामधील भाटघर व निरा-देवघर धरणे असून या धरणातील पाण्याचे नियोजन कालवा सल्लागार समितीमार्फत होत असते. परंतु सदरच्या कालवा सल्लागार समितीचे या वर्षीचे आवर्तनाचे नियोजन पाहता भाटघर धरणाची पाणी पातळी मागील वर्षीच्या तुलनेने यंदा २० टक्के, तर निरा देवघर धरणाचा ३० टक्क्याने झपाट्याने कमी झाला आहे.धरणांच्या पाण्याच्या विसर्गाची परिस्थिती अशीच सातत्याने राहिली तर पूर्व - पश्चिम भागातील गावांना दोन्ही धरणांच्या पाणी पुरवठयाच्या योजनांना भविष्यात काही महिन्यांमध्ये पाणी उपलब्धततेच्या टंचाईला सामोरे जावे लागणार आहे. तसेच शेतीची आवर्तने देखिल दोन्ही धरणांच्याआवर्तनावर अवलंबून आहेत. त्याचप्रमाणे दुष्काळाच्या यादीमध्ये भोर तालुक्यातील वेळू,संगमनेर व भोर या तीन मंडळांपैकी संगमनेर व भोर मंडळामधील निरा-देवघर आणि भाटघर धरण भागातील अनेक गावे आहेत. विशेषता भोर शहराचा पाणीपुरवठा भाटघर धरणावरून होत असून जर या दोन्ही धरणांतील पाणी जादा प्रमाणावर सोडले तर या भागातील स्थानिकांना पाणी टंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागणार आहे. लोकप्रतिनिधी या नात्याने माझ्या कडे स्थानिक नागरिक आवर्तना बाबत तक्रारी घेऊन येत आहेत. या आवर्तनांमुळे शेतकरी, नागरिक भयभीत झालेले असून पाणी उपलब्धतेच्या बाबतीत स्थानिकांच्या मनामध्ये शंका निर्माण होत आहे. या दोन्ही धरणातील आवर्तनाव्दारे जादा प्रमाणात सोडण्यात येणारे पाणी तातडीने बंद करण्यात यावे. याबाबत आमदार संग्राम थोपटे यांनी जलसंपदा विभागाला निवेदन देऊन मागणी केली आहे. धरणातील पाण्याचा विसर्ग ताबडतोब बंद केला नाही तर लोकप्रतिनिधी या नात्याने तीव्र स्वरूपात आंदोलन करण्याचा इशारा आमदार संग्राम थोपटे यांनी दिला आहे.

दोन्ही धरणाच्या उजव्या - डाव्या कालव्या अस्तरीकरणाची कामे रखडले आहेत.यामुळे कालव्यां ची दुरवस्था मोठ्या प्रमाणात झालेली असून संबंधित विभाग कालव्याला पाणी न सोडता धरणाच्या वीज निर्मिती केंद्राच्या मोरीतून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू ठेवून धरणाचे पाण्याची पातळी झपाट्या ने कमी करत आहे. अस्तरीकरणाच्या कामासाठी शासनाकडे वेळोवेळी निधीसाठी पाठपुरावा करत आहे. परंतु निधी वेळेत उपलब्ध होत नसल्यामुळे कालव्यांची दुरावस्था झाली आहे. तसेच अधिकाऱ्यां वरती राजकीय दबाव टाकून निरा देवघर, भाटघर धरणातील पाणी पूर्व पट्ट्यात पळवले जात आहे. ऑक्टोंबर महिन्यात पालकमंत्री यांच्या अध्यक्षते खाली पाणी वाटपाबाबत कालवा समितीची बैठक घेण्यात येत असते. त्या समितीवर सचिव म्हणून अधिकारी, सदस्य म्हणून आमची नेमणूक केली जाते परंतु बैठकीचे अचानक निमंत्रण मिळते त्यामुळे बैठकीस उपस्थित राहता येत नाही. यामुळे संबंधित विभागावर नाराजी व्यक्त करीत असून पाणी वाटप हे शेतीच्या खरीप व रब्बी हंगामातील पिकांसाठी केली जाते. मात्र खरीप हंगामात भोर - वेल्हा तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाऊस असल्यामुळे या आवर्तनाची गरज नसून ही गरज रब्बी हंगामातील पिकांना वाढवून मे महिन्याच्या शेवटपर्यंत देण्यात यावी अशी मागणी आमदार संग्राम थोपटे यांनी केलेले आहे.

सातारा जिल्ह्यातील धोम - बलकवडी उजव्या कालव्यावरील पाण्यावर भोर तालुक्यातील वीसगाव चाळीसगाव खोऱ्यातील अनेक गावांचे शेती क्षेत्र ओलिताखाली असून मात्र या कालव्याला धरणातून आवर्तन न सोडल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या रब्बी हंगामातील पिके पाण्याअभावी सुकू लागलेली आहेत.तर पिण्याच्या पाण्याचे विहिरींची पाणीपातळी त घट होत असल्यामुळे पाणी टंचाईची समस्या होत आहे. तरी धरणाच्या उजव्या कालव्याला पाणी सोडण्यात यावी अशी मागणी आमदार संग्राम थोपटे यांनी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई याच्याकडे केली आहे.

# सिध्दरामेश्वर महाराज यात्रेतील अक्षता सोहळा भक्तिभावाने



**सोलापूर :** एकदा भक्तलिंग हर्ऽऽ बोला हर्ऽऽ, शिवयोगी श्री सिद्धेश्वर महाराज की जयऽऽ चा जयघोष... दुपारी १.४६ वाजता सत्यम सत्यम... दिड्डम... दिड्डम...चा उच्चार झाला अन् चारही बाजूंनी अक्षतांचा वर्षाव झाला...!

ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराजांच्या योगदंडाचा कुंभारकन्येशी विवाह सोहळा रविवारी भक्तिभावाने पार पडला. रंगीबेरंगी फुलांनी मांडवासारखा सजलेला संमती कट्टा येथे भक्तिमय वातावरणात उत्साहाने जमलेल्या लाखो भाविकांनी //'याची देही याची डोळा' हा सोहळा पाहिला. पांढ//ऱ्या शुभ्र बाराबंदीमुळे जणू धवल सागराला भरती आल्याचे मनोहारी चित्र पाहायला मिळाले. सुमारे ९०० वर्षांची परंपरा असलेल्या ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर यात्रेच्या दुस//ऱ्या दिवशी रविवारी श्री सिद्धरामेश्वर मंदिर परिसरातील संमती कट्ट्यावर योगदंडाबरोबर अक्षता सोहळा संपन्न झाला. भक्तिमय वातावरणात झालेल्या या सोहळ्यास भाविकांचा जनसागर उसळला होता. सकाळी श्री मल्लिकार्जुन मंदिराजवळ हिरेहब्बू वाड्यात मानकरी राजशेखर हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पूजा



करण्यात आली. त्यानंतर योगदंड व पालखी श्री सिद्धरामेश्वर मंदिराकडे मार्गस्थ झाली. परंपरेनुसार जागोजागी भाविकांनी नंदीध्वजांची पारंपरिक पध्दतीने पूजा केली. हिरेहब्बू यांच्या घरापासून निघालेली पालखी पुढे दाते गणपती दत्त चौक, सोन्या मारुती, माणिक चौक, विजापूर वेस, पंचकट्टा, सिद्धेश्वर प्रशालामार्गे संमती कट्ट्यावर पालखी व योगदंड पोहोचले. नंदीध्वजांच्या मार्गाकडे डोळे लावून बसलेल्या भाविकांचे चेहरे दुपारी १२.३५ वा. च्या सुमारास आनंदाने खुलले. पंचरंगी ध्वजासह सातही मानाच्या नंदीध्वजांचे आगमन झाल्यानंतर डोळे मिटून हात जोडून सर्वांनी नमन केले. पारंपरिक वाद्यांसह ढोलच्या दणदणाटाने वातावरणात अधिकच उत्साह संचारला होता. पांढ//ऱ्या शुभ्र बाराबंदीतल्या भाविकांची लाट संमती कट्ट्याच्या दिशेने येत होती. डौलाने संमती कट्ट्याकडे येणा//ऱ्या नंदीध्वजांना स्मार्ट फोनमधील कॅमे//ऱ्यात कैद करण्यासाठी भाविकांची धडपड सुरू होती. भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून पोलिसांनी मुख्य मार्ग बंद केला होता. आबालवृद्धांच्या मुखातील एकदा भक्तलिंग हर्ऽऽ बोला हर्ऽऽ, शिवयोगी श्री सिद्धेश्वर महाराज की जयऽऽ च्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला होता. //'ओम नमः शिवाय ओम नमः शिवाय'चा जप करण्यात आला. नंदीध्वजांच्या आगमनानंतर हिरेहब्बू श्री सिद्धेश्वर महाराजांच्या पूजेसाठी मंदिरात गेले. सकाळपासूनच वेदमूर्ती बसवराज शास्त्रींनी कन्नड, मराठी, हिंदी आणि इंग्लिश भाषेतून खुमासदार शैलीत निवेदन करून सर्वांनाच खिळवून ठेवले होते. तोवर संमती कट्ट्यावर विवाह सोहळ्याची तयारी पूर्ण झाली होती. संमती कट्ट्याजवळ गंगा पूजन व सुगडी पूजन झाले. मानकरी कुंभार यांच्याकडून दिलेल्या सुगडीचे हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पूजन केले. यावेळी मानकरी म्हेत्रे - कुंभार उपस्थित होते. यात्रिक निवास येथे संमती पूजन झाले. सुहास शेटे यांना राजशेखर देशमुख यांनी संमती पाने दिली. देशमुख यांनी हिरेहब्बू यांना दिली.

# 'मिस्ट्री मॅन' बाबत कंगनानं केला मोठा खुलासा, काय म्हणाली माहितीये?

बॉलीवूडची वादग्रस्त अभिनेत्री कंगना ही तिच्या एका फोटोमुळे चर्चेत आली होती. तो फोटो इतका व्हायरल झाला की त्यामुळे तिला त्यावरुन खुलासा करावा लागला. त्या फोटोमध्ये तिच्यासोबत असणारा मिस्ट्री मॅन कोण आहे, असा प्रश्न तिला विचारण्यात आला आहे.

काय म्हणाली कंगना?

मिस्ट्री मॅनसोबतचा तो फोटो व्हायरल झाल्यानंतर कंगनाला त्यावरुन खुलासा करावा लागला आहे. त्यात तिनं मोठी पोस्ट लिहून आपल्याविषयी लोकं कशाप्रकारे विचार करतात अन् त्यांना काय वाटते याविषयी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी देखील कंगनानं तिला ट्रोल करणाऱ्यांना परखडपणे सुनावले आहे. तिची ती पोस्ट चर्चेचा विषय आहे.

कंगना म्हणते, मला माहिती आहे माझा तो फोटो व्हायरल झाल्यानंतर चर्चेला सुरुवात झाली. मी बऱ्याचदा सलूनच्या बाहेर दिसते. त्यामुळे त्या व्हायरल झालेल्या प्रत्येक फोटोवर बोलणं मला योग्य वाटत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे, रस्त्यावरुन जाणाऱ्या प्रत्येक मुलगा अन् मुलगी यांच्यात सेक्शुअल रिलेशन असते असे समजणे चुकीचे आहे. त्यांच्यात दुसरेही नाते असू शकते की...मात्र लोकांना याचा विसर पडतो.

ती व्यक्ती कोणी एखादी चांगली हेअर स्टायलिस्ट असू शकते, किंवा कुणी एखादा क्लायंटही असू शकतो. किंवा तुमचा एखादा सह कलाकारही असू शकतो. मात्र आपल्याला लगेच त्यावरुन बोलण्याची घाई होते. तुम्ही एखाद्या सोबत बराच वर्ष काम केल्यानंतर तुमचा कुणी चांगला मित्रही होऊ शकतो. यावर कुणी विश्वासही ठेवत नाही. अशा शब्दांत कंगनानं तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

त्याचं झालं असं की, कंगनाचा सोशल मीडियावर त्या मिस्ट्री मॅन सोबत फोटो व्हायरल झाला होता. त्यानंतर वेगवेगळ्या चर्चेला उधाण आल्याचे दिसून आले. यानंतर अनेकांनी कंगणाला ती व्यक्ती कोण आहे अशी विचारणाही केली होती. यानंतर कंगनाला अखेर त्यावरुन खुलासा करावा लागला आहे. तिनं तिच्या नेहमीच्या परखड अंदाजात दिलेली प्रतिक्रिया चर्चेचा विषय आहे.

कंगनाच्या येत्या काळातील प्रोजेक्टविषयी सांगायचे झाल्यास, तिचा बहुचर्चित इमर्जन्सी नावाचा चित्रपट लिस्टमध्ये आहे. त्यामध्ये तिनं भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांची व्यक्तिरेखा साकारली आहे. काही महिन्यांपूर्वी त्याचा टीझर व्हायरल झाला होता. त्यात तिच्या अभिनयाचं चाहत्यांनी वारेमाप कौतुक केलं होतं.

कंगनाचा तेजस नावाचा चित्रपट नुकताच चाहत्यांच्या भेटीला येऊन गेला. मात्र त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. बॉक्स ऑफिसवरही हा चित्रपट फ्लॉप झाल्याचे दिसून आले. मात्र हा चित्रपट ओटीटीवर तुफान चालल्याचेही सांगण्यात येत आहे. याशिवाय तिच्या चंद्रमुखी नावाच्या चित्रपटाची देखील चर्चा झाली होती.






# केएल राहुलकडून काढून घेतली 'ही' जबाबदारी

केएल राहुलने वनडे वर्ल्डकपमध्ये मधल्या फळीतील फलंदात आणि विकेटकिपर म्हणून उत्तम भुमिका निभावली होती. त्यानंतर कसोटी संघात देखील त्याच्यावर विकेटकिपिंगचा भार सोपवण्यात आला होता. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावरील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत केएल राहुलने फलंदाजीपाठोपाठ दमदार विकेटकिपिंग देखील केली होती. त्यामुळे राहुलने तीनही फॉरमॅटमधील विकेटकिपर म्हणून पाहिले जात होते.

केएल राहुल हा मायदेशात होणाऱ्या इंग्लंडविरूद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत फक्त फलंदाज म्हणून खेळणार आहे. त्याच्या खांद्यावर विकेटकिपिंगचा भार असणार नाही. इंग्लंडविरूद्धची कसोटी मालिका २५ जानेवारीपासून हैदराबाद येथे सुरू होत आहे.